**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात बांबू लागवड आणि प्रक्रीया उद्योगाला चालना देण्यासाठी शासनाचं बांबू धोरण जाहीर

- रस्त्यावरच्या खड्ड्यांमुळे अपघाती मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबांना ६ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे महानगरपालिकांना
आदेश

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतर्फे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचं निवेदन सादर

**आणि**

- वेस्ट- इंडीज विरुद्ध दुसरा क्रिकेट कसोटी सामना जिंकून भारताने मालिकाही खिशात टाकली / कुलदीप यादव ठरला सामनावीर

**<><><><><>**

राज्यात बांबू लागवड आणि प्रक्रीया उद्योगाला चालना देण्यासाठी यंदा विशेष बांबू धोरण शासनाने जाहीर केलं आहे. धोरण कालावधीत ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या क्षेत्रात करण्यात येणार असून त्यात ५ लाखापेक्षा जास्त रोजगार निर्मिती  होईल. या अंतर्गत राज्यात १५ समर्पित बांबू क्लस्टर्स तयार करण्यात येतील तसंच कार्बन क्रेडिट बाजारपेठेचा लाभ या उद्योगाला मिळेल. राज्य मंत्रिमंडळाच्या आज मुंबईत झालेल्या बैठकीत ह्या धोरणाला मान्यता मिळाली.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक संस्था, वसतिगृह इत्यादींचा जीर्णोद्धार, जतन आणि संवर्धन करण्याच्या प्रस्तावालाही आज मान्यता मिळाली. या कामासाठी ५ वर्षांकरता ५०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात येणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद पीठांकरता नवीन पदनिर्मिती करण्यासाठीच्या निधी तरतुदीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या न्यायालयांकरता गट अ ते गट ड पर्यंत मिळून २ हजार २२८ पदं निर्माण करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

राज्यात रस्त्यावरच्या खड्ड्यांमुळे अपघात होऊन मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना ६ लाख रुपये नुकसानभरपाई द्यायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज संबंधित महानगरपालिकांना दिले. तसंच, अशा दुर्घटनांमध्ये जखमी झालेल्यांना ५० हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई द्यावी, असंही न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या पीठानं सांगितलं. चांगले आणि सुरक्षित रस्ते हा राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत नागरिकांच्या जगण्याच्या हक्काचा भाग आहे, याचा पुनरुच्चारही पीठानं केला.

**<><><><><>**

मुंबई आणि उपनगरातल्या नागरिक, व्यावसायिक आणि कंपनी मालकांना आता कोणत्याही मुद्रांक कार्यालयात दस्त नोंदणी करता येणार आहे. महसूल विभागानं नुकताच या संदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. रहिवासी किंवा व्यावसायिकांना त्यांच्याच विभागातल्या मुद्रांक कार्यालयात नोंदणी करण्याची अट काढून टाकण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरातल्या नागरिकांना आता बोरिवली, कुर्ला, अंधेरी, ओल्ड कस्टम हाऊस जवळचं प्रधान मुद्रांक कार्यालय या कार्यालयांत मालमत्ता करार, भाडे करार, वारसा हक्कपत्र याशिवाय अन्य महत्त्वपूर्ण कागदपत्रांची दस्त नोंदणी प्रक्रिया पूर्ण करता येईल.

**<><><><><>**

देशातल्या सर्व महानगरपालिकांमधे जमा होणाऱ्या कचऱ्याचा वापर महामार्गांच्या बांधकामासाठी केला जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि

महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते काल चेन्नई मध्ये एका कार्यक्रमात बोलत होते. रस्ते बांधणीसाठी कचऱ्याचा वापर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण योजना आखत असून २०२७ पर्यंत ती प्रत्यक्षात येईल असं ते म्हणाले.

देशात आतापर्यंत महानगरपालिकांच्या ८० लाख टन कचऱ्याचा वापर महामार्गांच्या बांधकामासाठी करण्यात आला असून, यामध्ये अहमदाबाद-पुणे राष्ट्रीय महामार्ग आणि मुंबई-दिल्ली राष्ट्रीय महामार्गाचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षा भूमीवर बुद्ध धम्माचा स्वीकार केला तो दिवस होता १४ ऑक्टोबर १९५६, विजयादशमी.
विजयादशमीला धम्मचक्रप्रवर्तन दिन साजरा केला जातो. आज तारखेनुसार या घटनेचा वर्धापन दिन असल्याने आजही दीक्षाभूमीवर आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने येत आहेत. दीक्षाभूमी परिसरात विविध मूर्ती, पुस्तकांचे स्टॉल लागलेले आहेत. नागपूरच्या काटोल रोडवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय शांतिवन इथं आज सुगम संध्या तसंच बुद्ध वंदनेचं आयोजन करण्यात आलं आहे, तसंच बाबासाहेबांचा जीवन प्रवास दाखवणारं चित्र प्रदर्शन देखील भरलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मतदार याद्यांमधली नाव नोंदणी, मतदान प्रक्रियेमधली पारदर्शकता, व्हीव्ही-पॅट पद्धतीचा वापर, ईव्हीएम मशीन, या आणि इतर मुद्द्यांबाबत आपलं निवेदन सादर करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांची भेट घेतली. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज

ठाकरे, युवासेनाप्रमुख शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, शेकापचे जयंत पाटील, समाजवादी पक्षाचे रईस शेख, मुंबई कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांच्यासह महाविकास आघाडीतल्या सहयोगी पक्षांचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

अमरावती जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी आरक्षण काल  जाहीर करण्यात आलं आहे. यात ३० जागा महिलांसाठी राखीव असणार  आहेत. यासोबतच जिल्ह्यातल्या १४ पंचायत समित्यांच्या सभापतिपदांसाठी सुद्धा आरक्षण सोडत काढण्यात आली आहे.

**<><><><>**

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याप्रकरणातले मुख्य आरोपी, वीरेंद्र तावडे, शरद कळसकर आणि अमोल काळे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचनं आज जामीन मंजूर केला. न्यायमूर्ती शिवकुमार दिगे यांच्या एकल पीठानं ते तोंडी आदेश दिले. आदेशाची प्रत अद्याप उपलब्ध झालेली नाही.

**<><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीचा दर सप्टेंबर महिन्यात १३ शतांश टक्के होता. यंदाच्या ऑगस्टमध्ये हा दर ५२ शतांश टक्के आणि गेल्यावर्षीच्या सप्टेंबरमध्ये १ पूर्णांक ९१ शतांश टक्के होता. खाद्यपदार्थ आणि इंधनाच्या दरात झालेल्या कपातीमुळं चलनवाढीत घट झाली.

**<><><><>**

नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा सदस्य असलेल्या भूपती उर्फ मल्लोजुला वेणुगोपाल यांनं गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याची बातमी वृत्तसंस्थेनं दिली आहे. त्याच्यावर १० कोटी रुपयांचं बक्षीस होतं. त्याच्यासोबत ६०

नक्षलवादी सुद्धा होते. यामुळं नक्षल चळवळीला मोठा हादरा बसल्याची चर्चा आहे. पोलिसांनी मात्र या आत्मसमर्पणाच्या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही. काही दिवसांपूर्वी ‘शस्त्र उचलणं ही चूक होती’, ‘जनतेची माफी मागून शांततेचा मार्ग स्विकारणं गरजेचं आहे’ या आशयाचं पत्र लिहिलं होतं. केंद्रीय समितीच्या सदस्यांनी त्याच्या या भूमिकेला विरोध केला होता.

**<><><><><>**

२०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत ११ लाख ८९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलन झालं आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत कर महसुलात ६ पूर्णांक ३३ शतांश टक्के वाढ झाल्याची माहिती प्राप्तीकर विभागानं दिली आहे. १ एप्रिल ते १२ ऑक्टोबर या काळात कंपनी करापोटी सुमारे ५ लाख २ हजार कोटी, तर वैयक्तिक करापोटी सुमारे ६ लाख ५६ हजार कोटी रुपये महसूल जमा झाला आहे. समभाग हस्तांतरणावरच्या करातून ३० हजार ८७८ कोटी रुपये महसूल मिळाला आहे.

**<><><><><>**

निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनधारक कल्याण विभाग येत्या १ ते ३० नोव्हेंबर दरम्यान देशभरात चौथी डीएलसी, अर्थात संगणकीकृत हयातीच्या दाखल्यांची मोहीम राबवणार आहे. आतापर्यंतची ही सर्वात मोठी मोहीम असून, देशातले एकूण २ हजार जिल्हे आणि उप-विभागीय मुख्यालयांमध्ये ती राबवली जाईल. या टप्प्यात देशभरात २ कोटीपेक्षा जास्त निवृत्ती वेतन धारकांना डिजिटल हयातीचे दाखले वितरित करण्याचं उद्दिष्ट असून, निवृत्ती वेतनधारकांच्या सोयीसाठी फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानावर विशेष भर दिला जाईल.

**<><><><><>**

क्रिकेटमधे वेस्ट इंडीजविरुद्धचा दुसरा कसोटी सामना भारताने ७ गडी राखून जिंकला असून ही मालिकाही २-० अशी जिंकली आहे. नवी दिल्लीच्या

अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात आज खेळ  सुरु झाला तेव्हा भारताला विजयासाठी ५८ धावांची आवश्यकता होती. ३ गड्यांच्या मोबदल्यात भारतीय संघाने १२१ धावा केल्या.  वेस्ट इंडिज विरोधात कसोटी मालिकेतला भारताचा हा सलग १० वा विजय आहे. या सामन्यात कुलदीप यादव सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला,  तर मालिकावीराचा मान रविंद्र जाडेजाला मिळाला.

**//<><><><><>//**